महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
Web : www.dhepune.org.in E-mail : budget.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६१२२१११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. - अर्थसं - २०१७ /(९९/१७) वायो/ लेखा २ / ७३०८ दि. १५ जून २०१७
20 JUN 2017

प्रति,

१. संचालक, शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
२.सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती मुंबई.

**विषय - सन २०१७-१८ साठी कार्यक्रमावरील खर्च योजनांना अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप**

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यात येते की, केंद्र शासनाने सन २०१७-१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करुन फक्त महसुली खर्च व भांडवली खर्च असे वर्गीकरण करण्याचे ठरविलेले आहे तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्च ही संकल्पना रद्यबादल होवून त्याऐवजी बांधील खर्च (Establishment Expenditure) व योजनांवरील कार्यक्रमावरील खर्च (Scheme Expenditure) अशी विभागणी केलेली आहे. त्यामुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर हे शब्द प्रयोग न वापरता त्याऐवजी अनिवार्य खर्च व कार्यकमावरील खर्च असे शब्द प्रयोग वापरण्यात यावेत. अनिवार्य खर्च व कार्यकमावरील खर्च यामधील योजनाबाबतचा तपशील संचालननालच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी राज्य योजनांतर्गत कार्यक्रमावरील खर्च योजनांसाठी तरतूद अर्थसंकल्पीय करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालय / संस्था/ वसतिगृहे / कार्यालये यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी योजनानिहाय तसेच उद्दिष्टनिहाय मंजूर करण्यात आलेली तरतुदीचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. या तरतुदी विचारात घेवून

१) १३ कार्यालयीन खर्च, ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री ,२१ पुरवठा व सामुग्री या उद्यिष्टाखालील तरतुदीमधून खरेदीस वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबतचे प्रस्ताव, उद्यिष्टनिहाय एकत्रित सादर करण्यात यावेत. खरेदी प्रस्ताव सादर करताना, संस्था/ कार्यालय/ महाविद्यालय यांच्या स्तरावरील खरेदीची रक्कम वगळून उर्वरीत खरेदीचा एकच प्रस्ताव मान्यतेस्तव संचालनालयास सादर करण्यात यावा. खरेदी प्रस्ताव सादर करताना त्यासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे, उदा. दरपत्रकातील किमती ,दरकरारपत्रकाची वैद्यता इ. बाबी काळजीपूर्वक तपासून सादर करण्यात यावे. **एका उद्यिष्टासाठी एकच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.** एकापेक्षा अधिक प्रस्ताव सादर करण्यात येवू नये. अशा प्रस्तावाना वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येणार नाही. यासाठी कार्यालय प्रमुखांनी वर्षभरासाठी आवश्यक असणारी व साधनसामुग्री ,रसायने , काचसामान, उपकरणे, यंत्रसामुग्री , उपकरणे इ. बाबीचा आढावा घेवून खरेदी प्रस्तावित करण्यात यावी.

२) खरेदी करावयाच्या बाबींसाठी शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम दि. १७ एप्रिल २०१५ मधील तरतुदी विचारात घेण्यात याव्यात तसेच शासन निर्णय उद्योग व उर्जा विभाग क्र. भाकसं-२०१४/ प्र.क्र. ८२/ भाग iii/ उद्योग-६ दि.१/१२/२०१६ मधील खरेदीविषयक नमुद करण्यात आलेली खरेदी प्रकिया राबवूनच वित्तीय मान्यतेचे **प्रस्ताव दि.३१ /०८/२०१७** पर्यत संचालनालयास पाठविण्यात यावेत.

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,
.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

संचालनालयाचे पत्र क्र. - अर्थसं - २०१७ /(९९/१७) वायो/ लेखा २ दि. १५ जून २०१७ सोबतचे विवरणपत्र

*६) २२०२ सर्वसाधारण शिक्षण ०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०३ शासकीय महाविद्यालये व संस्था पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (०३) राज्यामध्ये न्याय सहाय्यक विज्ञान संस्था/नवीन न्याय सहाय्यक विज्ञान महाविद्यालये सुरु करणे (२२० एच०८२) मागणी क्रमांक डब्ल्यू -२*

| क्र. | खर्चाचे उद्दिष्ट | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, औरंगाबाद | शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ वेतन | २४४४३००० | २६२५२००० | २४५०५००० | **७५२०००००** |
| २ | ०६ दूरध्वनी वीज व पाणी शुल्क | ८२००० | २४०००० | २००००० | **५२२०००** |
| ३ | १० कंत्राटी सेवा | १००००० | ५००००० | ७००००० | **१३०००००** |
| ४ | ११ देशांतर्गत प्रवास खर्च | २०००० | २००००० | १००००० | **३२००००** |
| ५ | १३ कार्यालयीन खर्च | ५००००० | १२५०००० | १७५०००० | **३५०००००** |
| ६ | १७ संगणक खर्च | २०००० | ९०००० | १००००० | **२१००००** |
| ७ | २० इतर प्रशासकीय खर्च | २०००० | ३०००० | ५०००० | **१०००००** |
| ८ | २१ पुरवठा व सामग्री | ६००००० | ९००००० | १०००००० | **२५०००००** |
| ९ | २८ व्यावसायिक सेवा | ५००००० | ४००००० | ६००००० | **१५०००००** |
| १० | ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री | ८००००० | १०००००० | १२००००० | **३०००००००** |
| | **एकूण** | **२७०८५०००** | **३०८६२०००** | **३०२०५०००** | **८८१५२०००** |

**१४) २२०२ सर्वसाधारण शिक्षण ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन राज्य योजनातर्गत योजना (००) (०३) विनाअनुदानित व कायम स्वरुपी विनाअनुदानित शिक्षण महाविद्यालयाकडून आकारण्यात येणा-या फीची निश्चितीकरण करण्यासाठी समिती स्थापन करणे (२२०२ आय ०२२) मागणी क्रमांक डब्ल्यू -२**

| | कार्यालयाचे नाव | सहसंचालक (उच्च शिक्षण ) शिक्षण शुल्क समिती मुंबई |
|---|---|---|
| क्र. | खर्चाचे उद्दिष्ट | मंजूर तरतुद रु. |
| १ | ०१ वेतन | ३१२०००० |
| २ | ०६ दूरध्वनी वीज व पाणी शुल्क | ३५००० |
| ३ | १० कंत्राटी सेवा | ५६४००० |
| ४ | ११ देशांतर्गत प्रवास खर्च | १००००० |
| ५ | १३ कार्यालयीन खर्च | १०००००० |
| ६ | ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री | ३००००० |
| | **एकूण** | **५११९०००** |

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे